प्रत्येक प्रयत्नाचे आदर्श

॥श्री॥
जीवन्मुक्तानंदलहरी

सिद्ध साधक साधना
६ डिसेंबर २०२१

जीवन्मुक्त कोण? स्थितप्रज्ञ - अंतर

जीवनातून मुक्त नव्हे तर जीवन जगत असताना मुक्त!
प्रपंचात राहून, सर्व भोग अनासक्तवृत्तीने घेत असलेला -
शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात्।
त्याच्या भोवती प्रपंच असूनही या जीवन्मुक्ताला त्याचे
विस्मरण झालेले असते. असून नसल्यासारखा! कमलपत्र -
अलिप्तता व सौंदर्य यांचा मिलाफ.

यस्य स्थिता भवेत्प्रज्ञा यस्यानन्दो निरन्तरः वि.चू.
प्रपञ्चो विस्मृतप्रायः स जीवन्मुक्त इष्यते ॥४२८॥

जीवन्मुक्ती म्हणजे - <u>जीवभाव संकल्पभावनेपासून मुक्तता</u>
उच्चतत्वाच्या जागृतीमुळे तो नीचतर तत्वापासून मुक्त.
त्याचा अवबोध पक्का व स्थिर असतो
प्रपंचाचे भान नाही. तो गौण मानतो.
तो अवयवी असूनही निरवयव आहे.
त्याला जाणिवतत्वाचा महान प्रकाश प्राप्त झालेला
असतो. त्यामुळे त्याचे देहाशी असलेले नाते सावली
प्रमाणे असते. सावली चिखलात पडली, त्यावर कोणी
दगड मारला किंवा त्यावरून ट्रक जरी गेला तरी
त्याचा प्रत्यक्ष परिणाम व्यक्तीवर होत नाही.

सूर्यनमस्कार — प्रथम सूर्याकडे — नंतर सावलीकडे पहा

वर्तमानेऽपि देहेऽस्मिन् छायावदनुवर्तिनि।
अहंता ममताऽभावो जीवन्मुक्तस्य लक्षणम्।

गतकालाच्या शोक नाही. भविष्यकाळाची चिंता नाही.
वर्तमानकाळात हुरहुर होत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

हा समचित्त असल्याने देहात असून देहाचा नसतो.
सर्वत्र समचित्तत्वामुळे सगळीकडे आत्मतत्वाची अनुभूती
येत असते. त्याला आवरणात स्वारस्य नसते. 3.02.
त्यातून आरपार पाहण्याची 'क्ष किरण' शक्ती लाभते.
त्यामुळे सर्व वस्तुमात्रात तो प्रत्यगात्मा पहातो
∴ सुखद / दुःखद परिस्थिती मध्ये तो अविकारी असतो
ब्रह्माच्या जाणिवेच्या आनंदस्वरूप रसास्वादात तो मग्न
असतो. मनातीत असतो. मन हा Cancerचा व्रण आहे.
जोपर्यंत कर्माला मन जोडले जाते तोपर्यंत दुःख आहेच.
जीवन्मुक्ताला ब्रह्मानंदरसाची / अनंत सुखाची चटक लागते.
व्यसन लागते. त्यासाठी तो धडपडत असतो. ते प्राप्त
करून घेणारा तो यति!

योगरतो वा भोगरतो वा संगरतो वा संगविहीनः।
यस्य ब्रह्मणि रमते चित्तं नन्दति नन्दति नन्दत्येव॥

आध्यात्मिक आत्मतत्व हेच सर्वत्र असणारे आत्मतत्व
हा बोध त्याला झालेला असतो. संपूर्ण विश्व ज्या
पुरुषात क्रीडा करते ते म्हणजे त्याच्यातील आत्मतत्वच आहे
आणि अखिल विश्व हेही केवळ शुद्ध जाणिवतत्वच आहे.

सर्वसामान्य माणसातील अहंता - ममता ही शरीर-मन-
बुद्धि यामुळे प्रत्ययाला येते. शरीराचे प्रक्षोभ हे ~~मी~~ तो
स्वतःचे प्रक्षोभ समजतो. मात्र जीवन्मुक्त मी-दृष्टा किंवा
हे दृश्य असे मानत नाही. 'मी' आणि 'हे' याहूनही तो
तो सर्वत्र जाणिवतत्वाची क्रीडा पाहतो. तोच साक्षात्कारी
मानव - जीवन्मुक्त समजावा.

© www.madhaveeraghuveer.com

ब्रह्म मीच, मीच तेज, वारि मीच, मेदिनी।
मीच व्योम, वायु मीच, मजविणे नसे कुणी।
रुद्र मीच, मीच विष्णु, ब्रह्मदेव तेही मी।
स्वर्ग मृत्यु, सर्व गती, पूर्ण एक मीच मी॥

अशा जीवन्मुक्ताच्या जाणिवेमध्ये केवळ आनंदच भरून राहिलेला असतो. कारण सच्चिदानंद स्थिती अनुभवतो. त्यामुळे त्याचे अनुभव आणि सामान्यांचे अनुभव यात अंतर असणारच. या निशा सर्वभूतानां - - - -.

सद्गुरुंकडून मिळालेल्या उपदेशाने ज्याचा अज्ञानअंधार नाहीसा झाला आहे

पुरे पौरान् पश्यन् नरयुवतिनामाकृतिमयान्
सुवेषान् स्वर्णालं। करणकलितांश्चित्रसदृशान्
स्वयं साक्षात् द्रष्टे, त्यापि च कलयंस्तैः सह रमन्
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः।

आत्मचिंतनामध्ये निमग्न → मी द्रष्टा साक्षी आहे असे समजतो

पुर - नगरी, पौर - नागरिक - युवक युवती - आकर्षक नामरूप, उत्तम पोशाख, आभूषणे, साधनांनी युक्त अशांना पाहून, त्यांच्यामध्ये मिसळून व्यवहार करून देखील गुरुकृपा लाभलेला आणि जीवन जगत असताना त्यातील भोगांपासून अलिप्त असणारा मुनि कधीही व्यामोहात सापडत नाही. गुरफटत नाही. अलिप्त असतो.

वि + आ + मुह् — विशेषत्वाने मोहित होत नाही.

विमोह त्यागून कर्मफलांचा सिद्ध होई पार्थी।
कर्तव्याने घडतो माणूस जाणून पुरुषार्थी॥
रंगहीन मी या विश्वाच्या रंगाने रंगलो
कौरवात मी पांडवात मी अणुरेणुत भरलो
मीच घडवितो, मीच मोडितो, उरून आता परमार्थ

© www.madhaveeragdhuveer.com

वने वृक्षान् पश्यन् दलफलभरान् नम्रसुशिखान्
घनच्छायाच्छन्नान् बहुलकलकूजद् द्विजगणान्।
भजन् घस्रे रात्रावविनतलैकशयनो
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः।

फुले फळे, पाने, फांद्या यांच्या भाराने लवलेले उंच उंच किंवा डेरेदार वृक्ष असोत. त्यांची शीतल छाया वा मुक्त किलबिलाट करणारे पक्षिगण असोत. क्वचित कधीतरी अगदी घोर अंधार असताना, अमावस्येच्या रात्री जमिनीवर काही काळ शयन करावे लागले तरी हा मुनि कधीही विचलित होत नाही. कारण तो या आवेगांपासून काम, क्रोध, भय, मोहांपासून मुक्त असतो. खायला कोंडा अन् निजेला धोंडा।

सुखाने वनामाजि निजून जावे
उशाशी प्रभूचे मृदुपाद ध्यावे।
दिशांचा महापट ओढूनि ध्यावा
प्रभाते मनी राम चिंतीत जावा।

आभाळ मंडप
पृथ्वी आसन
रमे तेथे मन
क्रीडा करी
कंथा कुमंडलु
देह उपचार
जाणवितो
वारा अवसरा।

वि-चू-२८८ पिंड ब्रह्मांड -
स्वप्रकाशमधिष्ठानं स्वयंभूय सदात्मना।
ब्रह्माण्डमपि पिण्डाण्डं त्यज्यतां मलभाण्डवत्॥

ज्या महान गर्भाशयात सजीव प्राणिमात्र व निर्जीव वस्तुमात्राचे विश्व वाढीला लागते ते ब्रह्माण्ड | व्यक्तीचा पार्थिव देह - विचार, विकार, भावना
या दोन्ही अशाश्वत - मलाचे मडके समजून त्याग करावा

मन: प्रसाद चाहिए केवल क्या कुटिर क्या प्रासाद।
भाभी (सीता) का आल्हाद अतुल है मँझली मा (कैकयी) का
विपुल विषाद

मैथिलीशरण गुप्त।

© www.madhaveeraghuveer.com

कदाचित्प्रासादे क्वचिदपि च सौधेषु धनिनाम्
कदा काले शैले क्वचिदपि च कूलेषु सरिताम्
कुटीरे दान्तानां मुनिजनवराणामपि वसन्
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥३॥

जीवन हे क्षणभंगुर आहे. परंतु तरीही या एवढ्याशा आयुष्यात कितीतरी चढउतार येत असतात. वैभवाच्या शिखरावर असणारी व्यक्ती पुढे दारिद्र्याचे चटके अनुभवते.

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामन्तचक्रं च तत्
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत् ताश्चन्द्रबिम्बाननाः।
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बन्दिनस्ताः कथाः
सर्वं यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः॥

गेला तो नृप ते प्रधान अवघे ते पंडितांची सभा।
गेली ती नगरी तशा शशिमुखी ज्या तत्तर्हेमप्रभा।
गेला तो नृपपुत्रसंघ शुभकथा त्यां देखिले सर्व जे
ते ज्याने स्मरणास योग्य रचिले कालासि त्या वंदिजे॥

परंतु या सगळ्याचे दुःख सामान्यजनांना! जीवन्मुक्त सज्जन असूनही अलिप्त, तटस्थ, साक्षी!

प्रासाद, सदना, हवेल्या, यामध्ये वास्तव्य असो किंवा कधी उघड्या डोंगरावर, कधी नदीकिनारी तर कधी शांत-दांत मुनिजनांच्या कुटीरामध्ये वास्तव्य असो. गुरुकृपेचा वर्षाव ज्याच्यावर झाला आहे असा मुनी कधी मोहाच्या आहारी जात नाही.

साधू गाँठ न बाँधई, उदर समाता लेय।
आगे पीछे हरि खड़े जब माँगे तब देय॥

©www.madhaveeraghuveer.com

क्वचित् बालैः सार्धं करतलकगतालैः सहासितः
क्वचित् तारुण्यालंकृतनरवधूभिः सह रमन्
क्वचित् वृद्धोद्विग्नाकुलितहृदयैश्चापि विलपन्
मुनिर्न व्यामोहं ॥४॥

एकदा त्या एकमेवमाद्वितीय आत्मतत्वाची अनुभूति आली की मग सर्वत्र तेच तत्व दिसू लागते. मग वेगळेपणा उरलाय कुठे? तेच तत्व राजातही आहे व तेच भिकाऱ्यातही! विद्वान-निरक्षर-ऋषि-ससा-डायनॉसोर-फुलपाखरु। आत्मतत्वाला लिंग नाही, आकार नाही, रंगरुप नाम नाही। आहे ते (अस्तित्व) Existence. आणि म्हणून भेद नसल्याने हा कोणातही रमतो. लहान मुलांमध्ये अत्यंत हसत खेळत रमल्या वागून रममाण होतो. किंवा तरुण तरुणींच्या घोळक्यामध्ये चेष्टा मस्करी देखील करतो. कधी वृद्धांच्या तब्येतीची चौकशी करतो तर कधी त्यांच्या व्यथांनी, आजाराने, विकाराने काळजीतही भागीदार होतो, त्यांचे सांत्वन करतो. अशा रीतीने सर्वांत असूनही तो सर्वांपासून अलिप्त असतो. कारण गुरु-उपदेशाने त्याचे अज्ञान नाहीसे झालेले असते. वैराग्य दृढ झालेले असते. बुद्धिगत व्यामोह पुरता नष्ट झालेला असतो.

©www.madhaveeraghuveer.com

कदाचित् विद्वद्भिर्विविधबुधिभिरन्नसानिरतैः
कदाचित्काव्याङ्कं कृतिरसरसाज्ञैः कविवरैः
कदाचित् सत्तर्केरनुमितिपरस्तार्किकवरैः।
मुनिर्न व्यामोहं ॥५॥

परमार्थमार्गावरील अध्ययनामध्ये शास्त्रार्थ ही आवश्यक व महत्त्वाची पायरी आहे. आपले ज्ञान तपासून बघण्याची ती एक उत्तम संधी असते. एकमेकांपा विचारण्याची / एकमेकाने अभ्यास – एकांगी खंडन मंडन / जिथे विद्वत्सभा आहे तिथे हा जाऊन अगदी हिरीरीने सहभाग घेतो. परंतु त्यातील हारजीत याविषयी तटस्थ / परंतु म्हणून हा रूक्ष, कोरडा नाही. कारण काव्यशास्त्रविनोदातही सहभाग आहे. काव्याचा रसास्वाद रसिकतेने घेणारा / प्रहेलिका, कूटप्रश्न, शब्दचमत्कृतीने इतरांना जिंकणारा दाद देणारा / साहित्यातील विनोदावर खळखळून हसणारा / परंतु त्याच बरोबर तार्किक बुद्धिवाद्यांबरोबर तर्कशुद्ध प्रमाण वचनांवर भाष्य करणारा असा हा मुनि - - -

© www.madhaveeraghuveer.com

कदा ध्यानाभ्यासैः क्वचिदपि सपर्यां विकासितैः।
सुगन्धैः सत्पुष्पैः क्वचिदपि दलैरेव विमलैः।
प्रकुर्वन्देवस्य प्रमुदितमनाः सन्नतिपरो
मुनिर्न व्यामोहं

सन्नति - Respect, sacrifice

सपर्या - Worship, honouring, Service, Attendence.

कधी गलबला कधी निवळ। ऐसा कंठीत जावा काळ। जेणेकरिता विश्रांति केवळ। आपणासी फावे।

कधी एकांतात ध्यानधारणा करणारा हा कधी कधी इतरांची सेवा करण्यातही धन्यता मानतो. पूर्णपणे उमललेल्या सुगंधी फुलांच्या माळा तयार करून त्या आराध्यदेवतेला अर्पण करतो. क्वचित पानाफुलांची आकर्षक रचना करून (रांगोळी) संतुष्ट करतो आणि देवाला प्रसन्न करून स्वतःही प्रसन्न होतो. टवटवीत सुगंधी फुले, निर्मळ दुर्वांकुर, तुळसीदळ, बिल्वदळ यांनी परमेश्वराची समाराधना करतो. कधी कधी प्रसन्नचित्ताने परमेश्वराची स्तोत्रे व भक्तिरसाने परिपूर्ण पदेही म्हणण्यात गर्क झालाअसतो. त्याच्या बाबतीत कर्तव्यकर्माबद्दल आळस, उपेक्षा, तुच्छ बुद्धि, विमुखता इ. कधीही घडणार नाहीत.

समर्थ - श्रीरामकथा घडघडारे करावी

आद्य शंकराचार्य - निर्गुणाकडेवर सगुणाची सगुणोपासनाकरत.

स्तवन, मानसपूजा, परापूजा

©www.madhaveeraghuveer.com

शिवाया: शम्भोर्वा क्वचिदपि च विष्णोरपि कदा
गणाध्यक्षस्यापि प्रकटितवरस्यापि च कदा।
पठन्वै नामालिं नयनरचितानन्दसलिलो
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमा: ॥८॥

आत्मस्वरूपात रमलेला हा योगी सर्व देवांना अभेदबुद्धीनेच भजत असतो. हा विष्णु, हा शंकर, हा गणपती, ही देवी (पंचायतन) हा भेदभावच त्याचेकडे उरत नाही. आणि भेदभाव म्हणजेच व्यामोह! तो त्याच्या चित्तातून पूर्ण नाहीसा झालेला असतो. तो कधी देवीची / शंकराची / विष्णूची / गणपतीची / सूर्यनारायणाची किंवा इतर देवांची समाराधना करील. १०८ नामे, सहस्रनामे म्हणत बसेल. (ललिता, गणेशनामावलि) असे करताना त्याच्या नेत्रातून आनंदाश्रू वाहतील. पुन्हपुन्हा नेत्र भरून येतील. कारण त्याच्या चित्तामध्ये कोणत्याही देवाविषयी उचित-अर्थ अभिमान नसतो. शैव x वैष्णव उभे आडवे गंध, सारवण, कपडे वाळत घालणे.

तो त्याच्या मनातील आत्मतत्त्व जाणतो.

देव देऊळ परिवारु । कीजे कोरुनि डोंगरु ।
तैसा भक्तिचा वेव्हारु । का न व्हावा ॥ | अमृतानुभव

एकाच दगडातून शाळुंका, शिव, मार्कंडेय, यम, पार्षद, देऊळ व देवाचा परिवार — जरी वेगवेगळे तरी दगड-एकत्वाने
ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा --- समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्
जीव हा ब्रह्मरूप आत्माशिवाय हरीची निःसीम सेवा करताच येणार नाही. खरी भक्ती चिद्वस्तु भावाच्या अनुभवातच आहे — शिवं भूत्वा शिवं यजेत ।

देऊळ तूचि तूच मूर्ति । तूच आरती पूजा भक्ती
तूच असता माझी कीर्ति । सांगायाचे काय, अनंता ॥

© www.madhaveeraguruveer.com

कदा गंगाम्भोभिः क्वचिदपि च कूपोत्थसलिलैः।
क्वचित्कासारोत्थैः क्वचिदपि सदुष्णैश्च शिशिरैः।
भजन्स्नानं भूत्या क्वचिदपि च कर्पूरनिभया।
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षासततमाः॥८॥

અસા હા આત્મજ્ઞાની મહાત્મા કધી ગંગેચ્યા પવિત્ર ઉદકાને સ્નાન કરેલ તર કધી વિહિરીતલ્યા પાણ્યાને| કધી અભ્યંગ કરૂન ઉષ્ણ પાણ્યાને તર કધી થંડ પાણ્યાને| કધી કાપરાસારખે સ્વચ્છ ભસ્મ અંગાલા લાવૂન ભસ્મસ્નાન કરેલ (નિ + મા) ના ગંગોદકાવિષયી આનંદ ના હાર-ખેદ

અતિ નિયમ કરૂ નયે| નિયમ કેલ્યાવિણ રાહૂ નયે| તો કશાનેહી અડકત નાહી. અવડંબર માજવત નાહી.

(આગતે સ્વાગતં કુર્યાત્ ગચ્છન્તં ન નિવારયેત્)

ઉપાસની મહારાજ — જસે અસેલ તસે|

વિદ્યાવિનયસંપન્ને બ્રાહ્મણે ગવિ હસ્તિનિ|

પાણી $H_2O$ | પરમાત્મતત્ત્વ સર્વત્ર સારખેચ

મન ચંગા તો કઠોતીમેં ગંગા|

कदाचिज्जाग्रत्यां विषयकरणैः संव्यवहरन्
कदाचित्स्वप्नस्थानपि च विषयानेव च भजन् ।
कदाचित्सौषुप्तं सुखमनुभवन्नेव सततं
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥८॥

योगी कधी जागृत अवस्थेमध्ये विषय / इंद्रिये यांच्या द्वारा अनेक सुखांचा उपभोग घेत असेल किंवा स्वप्नातही सुखदुःखे भोगत असेल. तर कधी कधी गाढ निद्रेमध्ये स्वतः सिद्ध स्वयंप्रकाश आत्मसुखाचा अनुभव घेत असेल. या तिन्ही अवस्थात व्यवहार करून तो अवस्थातीत असतो

जागृती / स्वप्न / सुषुप्ति - पलीकडील तुर्यावस्था

यः स्वप्नजागर सुषुप्तिमवैति नित्यं
तद् ब्रह्म ~~xxx~~ निष्कलमहं न च भूतसंघः ॥

जागृती - सजगता
स्वप्न - संमिश्र
सुषुप्ति - पूर्णनेणीव } जनसामान्य

परंतु योगी पुरुष या त्रयींच्या पलीकडे असतो
जाणीव नेणीव भागवंती नाही.

© www.madhaveeraghuveer.com

कथाऽप्याशावासाः क्वचिदपि च दिव्याम्बरधरः।
क्वचित्पंचास्योत्थां त्वचमपि दधानः कटितटे।
मनस्वी निस्संगः सुजनहृदयानन्दजनको
मुनिर्न व्यामोहं ॥१०॥

मनस्वी योगी कोणत्याही परिस्थितीत शांत असतो. एखाद्या वेळेला अंगावर वस्त्र नसले तर तो दिगंबर स्वरूपात आनंदाने राहतो तर कधी बहुमोलाची दिव्य वस्त्रे परिधान करतो. क्वचित कधी कमरेभोवती व्याघ्रचर्म गुंडाळून फिरतो. मनाने अतिशय उदार, निस्पृह, निर्भय असतो. सुजनांच्या हृदयाला आनंद देणारा असा तो असतो.

समर्थ रामदासस्वामी — वेडगळाईचे वस्त्र पांघरले.

स्त्री पुरुष हा लिंगभेद आत्म्याला नाही. आत्मा x आत्मी

उपासनी महाराज — कमरेला पोतं / तरट

मन चंगा तो कठौती में गंगा।

आचार्य मनीषापंचक -

चाण्डालोऽस्तु स तु द्विजोऽस्तु गुरुरित्

एषा मनीषा मम।

एका भांड्यात दारू। दुसऱ्या भांड्यात शुद्ध गंगाजल
तरीही त्यात पडणारे आकाशाचे प्रतिबिंब निर्लेप असते.

---

पुस्तकावली ३ रा दिवस

घोरसर्प मऊगादी
नगरजन, वृक्ष-वेली, शय्या-भूमि, प्रासाद,-कुटिर,
बाल-तरुण-वृद्ध-। विद्वान चर्चा - काव्यरसास्वाद।
ध्यान धारणा - पुष्पमाला। अनेक देवांमध्ये एकत्व।
अनेकी सदा एक देवासी पाहे। गंगाजल-विहिर-भस्म।
जागृती-स्वप्न-सुषुप्ति। त्रिगुणातीत स्वरूप। दिगम्बर-दिव्याम्बर

कदाचित्सत्त्वस्थः क्वचिदपि च ~~[illegible]~~ रजोवृत्तिसुगतः
~~कदाचिदानन्दं [illegible]~~

तमोवृत्तिः क्वापि त्रितयरहितः क्वापि च पुनः ।
कदाचित्संसारी श्रुतिपथविहारी क्वचिदहो
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥ ११॥

असा ज्ञानविज्ञानसंपन्न योगी, कधी सत्त्वगुणाने युक्त तर कधी तमोगुणाने युक्त तर कधी त्रिगुणांच्या पलीकडे अशी वृत्ति धारण करतो तर शुद्धसत्त्वगुणसंपन्न असतो. (त्याधा वेळी) सामान्य माणसाप्रमाणे रजोगुणी होऊन संसारात गुरफटलेला दिसतो. तर (त्याधा वेळी) वेदशास्त्रविहित कर्मांचे तत्परतेने आचरण करतो.

दुर्वास, जमदग्नि - संतापी
एकनाथ, वसिष्ठ - संसारी - याज्ञवल्क्य → संन्यास
व्यास - सात्त्विक
वाल्मीकी - पापाकडून पुण्याकडे
विश्वामित्र - मोहाच्या आधीन

जाली स्वेच्छाचि विधी । स्वैर जाली समाधी
दशे इये मोक्षसिद्धी । बैसो घापे ॥९.३३॥
अमृतानुभव

ज्ञात्याचे स्वेच्छानुरूप वर्तन हाच विधी आहे व नियमबंधरहित व्यवहार हीच समाधी आहे. त्याला बसण्यासाठी मोक्षैश्वर्याचे बसकर घातले आहे
वेदप्रणीत विधिविधानाचे त्या ज्ञात्याला बंधन नसते

स्वभावतःच नियम जागे झाल्यानंतर उरत नाहीत.

© www.madhaveeraghuveer.com

कदाचिन्मौनस्थः, क्वचिदपि च वाग्वादनिरतः
कदाचित्सानन्दं हसितरभसत्यक्तवचनः।
कदाचिल्लोकानां व्यवहृतिसमालोकनपरो
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥ १२॥

વ્યવહારાત વાગતાના હા જીવન્મુક્ત કધી મૌન ધારણ કરેલ તર એખાદ્યા વેળી આપલ્યા પ્રભાવી વક્તૃત્વાનૂન વેદાંતાચે પૂર્ણપણે નિરૂપણ કરેલ. કધી બોલાયચે સોડૂન મોકળેપણાને આપલ્યા આનંદાત હસત રાહીલ. કધી લોકાંચ્યા વ્યવહારાચે બારકાઈને નિરીક્ષણ કરત રાહીલ. પરંતુ હે સર્વ કરત અસતાના ત્યાચ્યા બુદ્ધીલા તિળમાત્રહી વ્યામોહ હોણાર નાહી.

કધી ગલબલા કધી નિવળ | ઉદ્યાનશાસ્ત્ર - નિદ્રાનિરૂપણ | પાકકલા

Observation - સંસાર ન કરતાહી બારકાવે

ભજ ગોવિન્દમ્ - ચર્પટપંજરિકા - સામાન્ય જનજીવનાચે અચૂક વર્ણન

પ્રૌઢોઽહં યૌવનસ્થો વિષયવિષધરૈઃ પંચભિર્મર્મસન્ધૌ
દષ્ટો નષ્ટો વિવેકઃ સુતધનયુવતિસ્વાદુસૌખ્યે નિષણ્ણઃ।
શૈવીચિન્તાવિહીનં મમ હૃદયમહો માનગર્વાધિરૂઢં
ક્ષન્તવ્યો મેઽપરાધઃ શિવ શિવ શિવ ભો - - - -

©www.madhaveeraghuveer.com

कदाचित् शक्तीनां विकचमुखपद्मेषु कमलं
क्षिपन् तास्यां क्वापि, स्वयमपि च गृह्णन् स्वमुखतः।
तदद्वैतं रूपं निजपरविहीनं प्रकटयन्।
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः॥१३॥

શક્તીચી અનેક રૂપે આહેત - તારામ્બા, ભ્રમરામ્બા, કાલિકામ્બા, શારદામ્બા, ત્રિપુરસુંદરી -- ત્યાંચી ઉપાસના કરતાના ત્યા શક્તીંચ્યા પ્રસન્ન-વિકસિત મુખકમલાત ઘાસ ઘાલીલ કિંવા કધી ત્યાંચ્યા મુખાતીલ ઘાસ આપલ્યા મુખાને સેવન કરીલ. કધી કધી આપપરભાવ રહિત અશા પરમ અદ્વૈતરૂપાલા પ્રકટ કરીત રાહીલ. હે સર્વ કરત અસતાના ત્યાચ્યા અંતઃકરણાત - મી મોઠા સિદ્ધ, શાક્ત કિંવા ઉચ્ચ કોટીચા અદ્વૈત તત્ત્વવેત્તા, બ્રહ્મસાક્ષાત્કારી અસા વ્યામોહ નિર્માણ હોણાર નાહી.

કધી દિવ્ય સ્ત્રીચ્યા, મુખકમલી ઘાસાપ્રતિ સ્વયે
મુખે ઘાલી ઘેઈ, સ્વમુખિ મગ ઠેવી, મુખ મુખી।
અભેદાદ્વૈતાચા સ્વરૂપ મહિમા તો, પ્રગટવી
મુની તો મોહેના, નિજગુરુકૃપે, જ્ઞાન પદવી॥૫॥

© www.madhaveeraghuveer.com

क्वचित् शैवैः सार्धं, क्वचिदपि च शाक्तैः, सह वसन् ।
कदा विष्णोर्भक्तैः, क्वचिदपि च सौरैः, सह वसन्
कदा गाणाध्यक्षैः गतसकलभेदोऽद्वयतया
मुनिर्न व्यामोहं, भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥१४॥

ब्रह्मस्वरूपात रमलेला हा जीवन्मुक्त महात्मा कधी शैवांच्या म्हणजे शिवभक्तांच्या मेळ्यात रमलेला दिसेल तर कधी शाक्तांच्या म्हणजे देवीभक्तांच्या किंवा श्रीविद्येची उपासना करणाऱ्या भक्तांच्या समुदायात समरस झालेला दिसेल. कधी वैष्णवांच्या मध्ये तन्मय होऊन भजन कीर्तनात दंग होईल. तर कधी सौरांच्या म्हणजे सूर्यभक्तांच्या समूहात त्यांच्याशी समरस झालेला दिसेल. क्वचित कधी गाणपत्यांच्या समूहात सामील होऊन गणेशाची उपासना करताना दिसेल.

त्याच्या बुद्धीत मी अमुक संप्रदायाचा, देवाचा भक्त असा व्यामोह निर्माण होणार नाही. तो शैवात शैव, शाक्तात शाक्त, वैष्णवात वैष्णव असा समरस होऊन वावरत असेल. सर्वच देव देवतांना तो एकरूपाने अभेदरूपाने ब्रह्मभावाने पहात असेल. त्याच्या चित्तातील भेदभाव नाहीसा झाल्यामुळे त्याला व्यामोह होत नाही.

©www.madhaveeraghuveer.com

निराकारं क्वापि क्वचिदपि च ~~[illegible]~~ते: साकारममलं
निजं शैवं रूपं, विविधगुणभेदेन बहुधा ।
कदाऽऽश्चर्यं पश्यन्, किमिदमिति हृष्यन्नपि कदा
मुनिर्न व्यामोहं, भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥१५॥

આપલ્યા શિવસ્વરૂપી ઉપાસ્યદેવતાલા હા બ્રહ્મનિષ્ઠ જીવન્મુક્ત મહાત્મા કધી નિર્ગુણ નિરાકાર રૂપાને પહાતો તર કધી નિર્મળ શુદ્ધ સ્વરૂપાત સગુણ સાકાર પાહતો આપલે ઉપાસ્ય~~દૈવત~~ તત્ત્વ વિવિધ નામરૂપાને, વિશ્વરૂપાને વિવિધ ગુણભેદાંની જેવ્હા પ્રકટ હોતે તેવ્હા ત્યાલા મોઠી મૌજ વાટતે. આનંદવિભોર તર કધી આશ્ચર્ય ચકિત હોતો. તો આનંદ ત્યાચ્યા ઉદ્ગારાતૂન ઓસંડત અસતો. વારંવાર વંદન કરૂન તો ત્યા ભેદાતીત અભેદાલા અનિમિષ નેત્રાંની ન્યાહળત અસતો. આનંદમગ્ન હોતો ત્યાલા સગુણાત નિર્ગુણ વ નિર્ગુણાત સગુણાચી અનુભૂતી યેતે

નરહરી સોનાર - શિવભક્ત - પાંડુરંગ સ્વરૂપદર્શન
સમર્થ - દિસે કા રે ઉભા શ્રીરામા ?

कदाऽद्वैतं पश्यन् अखिलमपि सत्यं शिवमयं
महावाक्यार्थानाम् अवगति समभ्यासवशतः।
गतद्वैताभासः शिव शिव शिवेत्येव विलपन्
मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥१४॥

ब्रह्मनिष्ठ जीवन्मुक्त महात्मा व्यवहार करतांना या दृश्याचे द्वैत बुद्धीने पाहत असला तरी ते द्वैत तत्वतः सत्य नसून, सर्व विश्वच सत्यं शिवं सुंदरम्। या न्यायाने अविनाशी, आनंदमय, ब्रह्मस्वरूपच आहे याची अनुभूती।

महावाक्ये - प्रज्ञानं ब्रह्म
अहं ब्रह्मास्मि
तत्वमसि
अयमात्मा ब्रह्म

यांचा विचार करून - अभ्यासाने - आत्मानुभूतीने ∴ द्वैतभास पूर्ण मावळून जातो. असा योगी पुरुष शिव | शिवशंकरा | विष्णो | प्रभो | नारायणा | हरिहर माधव | विश्वनाथ | जगन्नाथ | विश्वंभर | परमेश्वरा जगदंब | जगज्जननी | पांडुरंगा अशा भक्तीपूर्ण शब्दांनी ~~सतत~~ नामोच्चार करत राहतो.

© www.madhaveeraghuveer.com

इमां मुक्तावस्थां परमशिवसंस्थां गुरुकृपा
सुधापांगव्याप्यां सहजसुखवाप्यामनुदिनम् ।
मुहुर्मज्जन् मज्जन् भजति सुकृतेश्चेन्नरवरः
तदा त्यागी योगी कविरिति वदन्तीह कवयः ॥७८

या सोळा श्लोकांनी वर्णन केलेल्या अवस्थेला मुक्तावस्था म्हणतात. ती प्राप्त होण्यासाठी गुरूचे पाठबळ हवे आणि गुरुकृपा हवी. ही अवस्था प्राप्त झाली असता त्या योग्याला परम, कल्याणमय, आनंदरूप शिवस्वरूपाच्या ठिकाणी स्थिती - स्थैर्य लाभते. गुरूच्या अमृतमय कृपादृष्टीने देखील ही सहजसुखाची पुष्करिणी प्राप्त होते. स्वतः सिद्ध स्वयंप्रकाशाने युक्त असणाऱ्या अशा पुष्करिणीमध्ये केवळ भाग्यवंतालाच रोज अवगाहन करायला मिळते. अशा योग्याला तत्त्ववेत्ते लोक त्यागी, योगी, कवी, तत्त्ववेत्ता, साक्षात्कारी म्हणतात. धन्य तो महात्मा. त्याचा जन्म सफल झाला. कृतकृत्य।

© www.madhaveeraghuveer.com

मौने मौनी गुणिनि गुणवान् पण्डिते पण्डितश्च
दीने दीनः सुखिनि सुखवान् भोगिनि प्राप्तभोगः।
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिनि प्रौढवाग्मी
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः॥८

त्रैलोक्यात विजयी, आदरणीय

जीवन्मुक्त महात्मा या जगात कसा वागतो?
तो मौन धारण करणाऱ्यांबरोबर मौन धारण करेल.
दया, दान, दाक्षिण्य इ. गुणसंपन्न लोकांमध्ये तो त्याच
गुणांनी अधिक संपन्न असलेला दिसेल. पंडा बुद्धी
म्हणजे विवेकशील लोकांमध्ये या महात्मा त्यांच्यापेक्षाही
अधिक पंडित म्हणजे ज्ञानविज्ञानसंपन्न असेल.
दुःखी लोकांमध्ये तो अधिकच दुःखी, अधिक शोकाकुल
झालेला दिसेल. त्यांच्याशी समरस होऊन त्यांच्या
शोकाचा परिहार करतो.

धनदारादि संपन्न सुखी लोकांच्या सान्निध्यात
त्यांच्या सुखाने तो आनंदी होतो. भोगी लोकांमध्ये
तो भोगसंपन्न असल्याप्रमाणे समाधानी दिसतो. मूर्खांमध्ये
मूर्खासारखा वागतो. (गाढवापुढे वाचली गीता) तरुण
स्त्रीपुरुषांमध्ये हास्यविनोद करत त्यांच्याप्रमाणे वागेल.
प्रौढ संभाषण करणाऱ्या बहुश्रुत लोकांमध्ये हा योगी
त्यांच्याहीपेक्षा प्रगल्भतेने वागेल. थोडक्यात लहानात
लहान व मोठ्यांमध्ये मोठ्याप्रमाणे वागतो.

कोणी अवधूत म्हणजे शुद्ध, निर्मल, अलख निरंजन
परम विरक्त असा भेटला तर हा त्यांच्यासारखाच
किंबहुना त्यांच्यापेक्षाही सरस असा भासतो.

© www.madhaveeraghuveer.com

मौना मौन दिसे गुणित गुणि हा पंडिति पंडितसा
दीना दीन दिसे सुखित सुखि हा भोगित भोगी दिसे।
मूर्खा मूर्ख असा स्त्रिया तरुणसा वक्त्यासि वक्ता दिसे।
तो हा धन्य जगी सुखी त्रिभुवनी जोऽवधूताऽवधूत॥

तो परब्रह्मस्वरूप - सूक्ष्म - व्यापक असल्याने तो कुठेही सामावू शकतो. अशी कोणतीही जागा नाही की जिथे याला प्रवेश नाही. रिता ठाव या राघवेवीण नाही.

आकाश - ~~घ~~ घटाकाश - मठाकाश - महदाकाश

नभासारिखे रूप या राघवाचे।

© www.madhaveeraghuveer.com